# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १००७/२०२३**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. राहूल अंबादास रोंघे, कडू ले आऊट, पंचवटी, काटोल, ता. काटोल जि. नागपूर-४४१३०२ | मुख्याध्यापक, गुरुवर्य आश्रम मतिमंद मुलांची निवासी शाळा, हनुमान नगर, काटोल ता. काटोल जि. नागपूर-४४१३०२ | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर |

**सुनावणी दिनांक :- २६.११.२०२५**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम. अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित (प्रतिनिधी)** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : १०.०४.२०२३

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ११.०४.२०२३

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : पुरविलेली माहिती अपुर्ण, खोडाखोड केलेली, वास्तव माहिती नष्ट केली आहे. त्या जागी नवीन माहितीची नोंद केलेली, दिशाभूल आणि फसवणुक केली.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०९.०९.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १६.०९.२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सत्र २००९-२०१० आणि सत्र २०१०-२०११

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : शिक्षक हजेरी रजिस्टरची झेरॉक्स प्रत पुरविण्याबाबत.



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर * नागपूर *

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती

अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गुरुवर्य आश्रय निवासी मतिमंद मुलाची शाळा, काटोल यांनी दिनांक २१.०९.२०२२ च्या पत्रान्वये, सत्र २००७ ते सत्र २०१० पर्यंतचे तीन शिक्षक हजेरी रजिस्टर हे नैसर्गिकरित्या उधळी लागल्याने ते खराब झाले. त्यामुळे दि. २०.१२.२०१४ रोजी कर्मचारी हजेरी रजिस्टर बाबतचा पंचनामा करुन उपस्थित साक्षीदारांच्या समक्ष व संस्था सचिव यांच्या परवानगीने वरील तीन वर्षाचे कर्मचारी हजेरी रजिस्टर नष्ट करण्यात आले. तसेच सत्र २०१० ते २०११ ची कर्मचारी हजेरी रजिस्टर शाळेत उपलब्ध असून त्याची सत्यप्रत आपणास पुरविण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले.

**४. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १७.१०.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती अधिकाऱ्याने पुरविलेली माहिती अपुर्ण, खोडाखोड केलेली, उपलब्ध वास्तव माहिती नष्ट केलेली आणि त्या जागी नविन माहितीची नोंद केलेली करीता दिशाभूल करणारी असल्याबाबत.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील

अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी दिनांक २५.०१.२०२३ रोजी सुनावणी घेवून दिनांक ३०.०१.२०२३ अन्वये, अपिलार्थी यांनी दि. २३.०९.२०२२ च्या माहिती अधिकाराच्या अर्जान्वये मागितलेली माहिती पुरविण्यात आल्याचे सांगितले. परंतु अपिलार्थी यांचे अर्जावरुन असे दिसून येते की, पुरविण्यात आलेली माहिती ही अपुरी व खोडाखोड केलेली व उपलब्ध माहिती नष्ट केली आणि त्या जागी नविन माहितीची नोंद केली अशी दिशाभूल करणारी माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना मुळ उपलब्ध व खरी माहिती तात्काळ विनामुल्य पुरविण्यात यावी. जन माहिती अधिकारी यांनी खरी माहिती पुरविण्यास टाळाटाळ करु नये, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा –**

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही.

२. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. सारंग सुभाषराव अनव्हाने उपस्थित असून त्यांनी स्पष्ट केले की, अपिलार्थी यांचा दिनांक ०९.०९.२०२२ रोजीचा माहिती अर्ज दिनांक १६.०९.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्याअनुषंगाने दिनांक २१.०९.२०२२ रोजी उपलब्ध असलेली सत्र २०१० ते २०११ ची कर्मचारी हजेरी रजिस्टर सत्यप्रत अपिलार्थीस पुरविण्यात आली आहे. तसेच सत्र २००७ ते सत्र २०१० पर्यंतचे तीन शिक्षक हजेरी रजिस्टर हे नैसर्गिकरित्या उधळी लागल्याने ते खराब झाले. त्यामुळे दि. २०.१२.२०१४ रोजी कर्मचारी हजेरी रजिस्टर बाबतचा पंचनामा करुन उपस्थित साक्षीदारांच्या समक्ष व संस्था सचिव यांच्या परवानगीने वरील तीन वर्षाचे कर्मचारी हजेरी रजिस्टर नष्ट

करण्यात आले, असेही अपिलार्थीस कळविले होते. त्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार दिनांक २०.०२.२०२३ रोजी पुनश्च: तीच माहिती पुरविण्यात आलेली आहे.

६. निष्कर्ष —

सदर प्रकरणी अपिलार्थी श्री. रोंघे यांनी दिनांक ०९.०९.२०२२ रोजी केलेला माहिती अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक १६.०९.२०२२ रोजी प्राप्त झाला. याची दखल घेत दिनांक २१.०९.२०२२ रोजी अपिलार्थीस उपलब्ध असलेली सत्र २०१० ते २०११ ची कर्मचारी हजेरी रजिस्टर सत्यप्रत अपिलार्थीस पुरविण्यात आली आहे. तसेच सत्र २००७ ते २०१० पर्यंत शिक्षक हजेरी रजिस्टर ला उधळी लागल्याने ते पंचनामा करुन नष्ट करण्यात आलेली आहे, अशी माहिती देण्यात आलेली आहे, असे आज झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले.

आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी श्री. रोंघे हे अनुपस्थित असल्यामुळे त्यांची बाजू आयोगास ऐकून घेता आली नाही. तथापि, त्यांनी त्यांच्या दिनांक १०.०४.२०२३ रोजी आयोगासमोर दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जात पुरविलेली माहिती अपुर्ण, खोडाखोड केलेली, वास्तव माहिती नष्ट केली आहे, असे नमूद केले आहे. ही बाब लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत अपिलार्थी यांच्या दिनांक ०९.०९.२०२२ रोजीच्या मुळ माहिती अर्जानुसार यापुर्वी पुरविलेल्या माहिती व्यतिरिक्त कार्यालयीन अभिलेखावर माहिती उपलब्ध असल्यास ती अपिलार्थीस विनामुल्य पुरविण्यात यावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे, या निर्देशासह प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील आदेशाच्या अधिन राहून, प्रस्तुतचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(गजानन निमदेव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २६.११.२०२५**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते *नागपूर*

जावक क्रमांक ---1025--- दिनांक -------------------------

30 JAN 2026